# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्याकलम ४२(६) अंर्तगत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १८ / २०२३

फिडर बेस मीटरींगच्या ऐवजी मीटर रिडींग प्रमाणे वीज देयके मिळण्याबाबत

वारस श्री. आनंदराव दत्तात्रय शिंदे ........................................................................ अपिलार्थी
(ग्राहक कै. दत्तात्रय रामचंद्र शिंदे)

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, इस्लामपूर (महावितरण) ........... .......................... .......... .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- आनंदराव दत्तात्रय शिंदे
जयवंत शामराव पाटील, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- संतोष कारंडे, कार्यकारी अभियंता, इस्लामपूर
राजेंद्र. सर्युवंशी, उपकार्यकारी अभियंता, इस्लामपूर

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २३ मार्च २०२३

आदेश पारित दिनांक :- ३१ मार्च २०२३

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २६ डिसेंबर २०२२ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजी दाखल केले.

२.	मंचाने तक्रारदार यांचे गाऱ्हाणे (क्रमांक ४०/२०२०-२२) दिनांक २६ डिसेंबर २०२२ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केले.

३.	अपिलार्थीच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे व दिनांक २३ मार्च २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

➢ अपिलार्थी हे दिनांक ५ फेब्रुवारी १९८५ पासून महावितरणचे ३ एचपीचे (क्रमांक २८४१४०२५७०५१) मुक्काम पोष्ट बोरगाव, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील कृषी ग्राहक आहेत.

➢ माहे डिसेंबर २०१७ चे वीज देयकात चालू रिडींग ५४०३ केडब्लूएच असे नमुद केले आहे. शाखा कार्यालय बोरगाव येथील वायरमनने मीटरची प्रत्यक्ष पाहणी करून दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी ७०११ केडब्लूएच अशी नोंद केली. मार्च २०१८ ते सप्टेंबर २०२० ची वीज देयके अपिलार्थीस मिळाली नाहीत. डिसेबर २०२० च्या वीज देयकावरील रूपये ६,५४०/- रक्कमेचा भरणा दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी ऑनलाईन केलेला आहे. तसेच, माहे डिसेंबर २०२१ पर्यंत असणारे वीज देयकाची रक्कम रूपये ३६२०/- आलेली आहे तीचाही भरणा अपिलार्थीने केलेला आहे.

➢ ठोकळ पध्दतीने विचार केला असता सप्टेबर २०२० ते डिसेबर २०२१ या कालावधीत महावितरणने अंदाजे रू.१०१६०/- चे वीज देयक दिली आहेत तथापि, प्रत्यक्ष मीटरवाचनाप्रमाणे वीज देयके आकारणी केली असती, तर, ती रू.५१५३/- ची झाली असती म्हणजेच महावितरणने एकुण रू.५००६/- ची अतिरीक्त वीज देयके आकारणी केली आहे.

➢ अपिलार्थीनी दिनांक ८ एप्रिल २०२२ रोजी मंचाकडे अभिवेदन दाखल केले. मंचानी अपिलार्थीचे अभिवेदन दिनांक २६ डिसेंबर २०२२ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केले. मंचास ग्राहकाच्या गाऱ्हाण्याचा मुळ उद्देश समजला नाही.

➢ मंचानी आयोगाच्या केस क्र.३२२/२०१९ दिनांक ३० मार्च २०२० च्या अनुषंगाने दिलेला निर्णय व त्यानुसार मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण यांनी प्रसिध्द केलेले परिपत्रक क्र.३२६ दिनांक ११ मे २०२० चे कलम ५५ व आयोगाच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील कलम १४.३ च्या विरुध्द आहे, याचा कोणताही विचार न करता मंचाने निर्णय दिलेला आहे. आयोगाचे कलम १४.३ खालील प्रमाणे.

*"१४.३ मीटरच्या नोंदी घेणे*

*एखादया ग्राहकाकरीता किंवा ग्राहकाच्या वर्गाकरीता आयोगाने विशिष्ट मंजूरी दिली नसेल तर मीटरच्या नोंदी घेण्याचे काम अधिकृत प्रतिनिधीकडून कृषी ग्राहकांच्या बाबतीत किमान तीन महिन्यांतून एकदा आणि इतर ग्राहकांच्या बाबतीत किमान दोन महिन्यांतून एकदा करण्यात येईल. "*

- कलम १४.३ नुसार कृषी ग्राहकाचे मीटर रिडींगचे वाचन तीन महिन्यातून एकदा घेणे बंधनकारक आहे. त्याचे उल्लंघन प्रतिवादीस करता येणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या शेती पंप कनेक्शनबाबत फिडर बेस ग्रुप मिटरींग बिलींग पध्दतीनूसार वीज देयके आकारणी करणेबाबत कधीही विनंती केली नव्हती, तथापि, प्रतिवादींनी ती पध्दत परस्पर चालू केली. सदर बाब ही ग्राहकाच्या मुलभुत हक्कावर व स्वातंत्रावर गदा आणणारी आहे. हि बाब सुध्दा मंचाने दुर्लक्षित केली.

- अपिलार्थींना ज्या फिडरवरून वीज पुरवठा केला जातो त्या फिडरवर समाविष्ट असणाऱ्या इतर घरगुती ग्राहकांना मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके दिली जात आहेत. मात्र, ज्या शेती पंपास मीटर नसतील, तर त्यांना प्रती एचपी प्रमाणे वीज देयके आकारावीत व मीटर असलेल्या कृषी ग्राहकांना मीटर वाचनाप्रमाणे देयके देण्यात यावी. प्रतिवादींनी मंचासमोर असा दावा केला की, अपिलार्थींना मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देता येणार नाही असे दिनांक २२ मार्च २०२० व दिनांक ११ जुलै २०२२ रोजी कळविलेले होते, हे धांदात खोटे आहे. वास्तविक, तसा कोणताही पत्रव्यवहार प्रतिवादींनी अपिलार्थींशी केलेला नाही. किंवा मंचासमोर त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा रेकॉर्डवर दाखल केलेला नाही.

- अपिलार्थींना मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके मिळत नसल्याने त्यांचे नाहकपणे आर्थिक नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या मोटारी पावसाळयात सहा महिन्याच्या कालावधीकरीता बंद असतात. परंतू त्या कालावधीमध्ये देखील शेतकऱ्यांना वीज देयके भरावी लागतात. अपिलार्थींना नाहकपणे आर्थिक व मानसीक त्रास सोसावा लागला त्यास प्रतिवादी जबाबदार आहेत.

- या सर्व बाबींचा विचार करता, अपिलार्थींनी खाली नमुद केल्याप्रमाणे आदेश व्हावा ही विनंती केली.

  १. महावितरणने घेतलेली अधिकची रक्कम रु.५००६.४८ ही व्याजासह परत मिळावी.
  २. त्या कालावधीतील विलंब आकार माफ करण्यात यावा.
  ३. येणे जाणेचा खर्च म्हणून रु.१,०००/- देण्यात यावे.

४. प्रतिवादी महावितरणने त्यांच्या दिनांक १५ मार्च २०२३ च्या उत्तरात नमुद केलेले मुख्य मुद्दे व दिनांक २३ मार्च २०२३ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेतः

- अपिलार्थी हे दिनांक ५ फेब्रुवारी १९८५ पासून महावितरणचे ३ एचपीचे (क्रमांक २८४१४०२५७०५१) मुक्काम पोष्ट बोरगाव, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील कृषी ग्राहक आहेत.

- माहे मार्च 2020 पर्यंत अपिलार्थींची वीज देयके ही अपिलार्थींच्या शेतावर बसविलेल्या मीटर वाचनाप्रमाणे आकारण्यात येत होती. अपिलार्थींचे कनेक्शन ११ केव्ही वाळवा वाहिनीवर आहे. माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा आदेश क्र.३२२ /२०१९ दिनांक ३० मार्च २०२० अन्वये जून २०२० पासून एच टी फिडर इनपुट बेस आधारीत ग्रुप मिटरींग (Input of HT base of feeder-based Group Metering / billing for AG consumers) आधारीत ५०२ एच टी फिडरची निवड करण्यात आली. या ५०२ एचटी फिडरमध्ये ११ केव्ही वाळवा वाहिनीचा समावेश करण्यात आलेला आहे. म्हणून सदर फिडरचा ३ महिन्याचा एकुण एचटी मीटरींगचे युनीटसची झालेली नोंद विचारात घेऊन व त्यावर १८% विद्युत हानी झाली ती वजा करुन आणि त्यावर असलेले वाडी वस्तीचे नगण्य घरगुती ग्राहकांचे वीज वापरही वजा करून राहीलेल्या युनीटसचे, कृषी ग्राहकांचे एकुण मंजूर कृषी भार विचारात घेऊन युनीटस वापराचा प्रती एचपी इंडेक्सप्रमाणे विभागला जातो. सदर पध्दतीनुसार त्या ग्राहकांच्या मंजूर विद्युत भाराप्रमाणे व प्रती एचपी इंडेक्सप्रमाणे येणारे वीज देयक एप्रिल २०२० पासून त्रैमासिक बिलींग देण्यात येते. त्यामुळे वैयक्तिक मीटर वाचनाप्रमाणे अपिलार्थींस वीज देयके देण्याचा प्रश्न उदभवत नाही. वरील फिडरवर ८२१ कृषी ग्राहक आहेत.

- प्रतिवादींनी असे नमुद केले की, तांत्रिक हानी ही सर्वसाधारणपणे ८ % पर्यंत जाते. नियमावलीमध्ये एचटी इनपुट मीटरींगमध्ये १८ % विद्युत हानीची तरतुद आहे व त्यानुसार वजावट करुन, त्यावर असलेल्या घरगुती ग्राहकांनी वापरलेली युनीटस वजा करुन राहीलेल्या युनीटसवर प्रती एचपी इंडेक्सप्रमाणे वीज देयके देण्यात येतात. सबब, ग्राहकांना वीज देयके देताना अन्याय झाला असे वाटत नाही.

- प्रतिवादींनी असे नमुद केले की, कृषी ग्राहकांचे क्षेत्र हे मोठे असल्यामुळे त्याठिकाणी वेळेत पोहोचता येत नाही, मीटर बॉक्सला कुलुप असते तसेच अनेक मीटर बंद वा जळालेले असल्यामुळे मीटर

रिडींगची नोद घेता येत नाही तसेच मीटर बॉक्स अडचणीच्या ठिकाणी लावलेला असल्याने वैयक्तिक मीटर वाचन करता येत नाही. ग्राहकांना स्वतःचे मीटर वाचन करुन महावितरणला पाठवून देण्याची सुवीधा उपलब्ध असतानाही काही कृषी ग्राहकांनी मोबाईक क्र. अद्यावयत केला नाही. सबब, ती सुवीधा कृषी ग्राहक वापरत नाही.

अपिलार्थीचे हे प्रगतीशील शेतकरी असून ऊस बागायतदार आहेत. त्यामुळे अपिलार्थीवर एचपी इंडेक्स प्रमाणे होणारे ५० युनीट ते २८० युनीट प्रती महिना हा योग्य आहे.

- अपिलार्थीनी वीज देयके न मिळाल्याचे तक्रार अधोरेखीत केली आहे, त्याबाबत प्रतिवादींनी नमुद केले की, मार्च २०१८ ते सप्टेंबर २०२० या कालावधीची देयके अपिलार्थीना वाटप न केलेबाबत संबधीत एजन्सीस योग्य ती समज देण्यात आली आहे. तथापि, महावितरणच्या कार्यालयात ग्राहक आल्यास व वीज देयके न मिळण्याबाबतची तक्रार असल्यास ग्राहकास वीज देयकाची प्रत कोणताही मोबदला न आकारता देण्यात येते. त्यामुळे त्याकालावधीची वीज देयके मिळाली नाही ही अपिलार्थीची तक्रार निरर्थक आहे. डिसेंबर २०२० पासून नियमितपणे वीज देयकांचे वाटप अपिलार्थीस करण्यात आले आहे. तसे अपिलार्थीच्या महावितरणच्या दफ्तरी नोंदणीकृत मोबाईलवर वेळोवेळी संदेशाद्वारे ही कळविण्यात आले आहे.

- जून २०२० पासून अपिलार्थीचे वीज देयक वापरलेल्या युनीटनुसार होत नसून आयोगाचा आदेश क्र.३२२ /२०१९ दिनांक ३० मार्च २०२० अन्वये जून २०२० पासून वाहिणीवरील निर्देशांकानुसार होत आहे, तसेच अपिलार्थीस डिसेबर २०२० पासून खालीलप्रमाणे सवलत सुध्दा देण्यात येत आहे.

| सप्टेंबर २०२० रोजीची सुधारीत थकबाकी | सप्टेंबर २०२० रोजीचे चालू देयक | डिसेंबर २०२० रोजीचे चालू देयक | सप्टेंबर २०२० रोजीच्या थकबाकीच्या ५०% रक्कम | सप्टेंबर २०२० च्या बिलावरील विलंब आकार | एकुण भरावयाची रक्कम | पुर्णांक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १०५८२.४४ | ४८९.२७ | ७४३.२७ | ५२९१.२२ | १४.१७ | ६५३७.९३ | ६५४० |

- वरील रकानात दर्शविलेली रु.६५४०/- दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी व डिसेंबर २०२१ अखेर असणारे वीज देयक रु.३६१०/-, दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी भरण्यात आली आहेत. अपिलार्थीने अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादींनी कोणतीही अतिरीक्त रक्कम आकारण्यात आलेली नाही.

➢ तसेच वरील तपशील अपिलार्थी ग्राहकास उपविभागीय कार्यालयाचे दिनांक १३ ऑक्टोबर २०२२ च्या पत्र क्र.२३९४ अन्वये कळविण्यात आला आहे. सदर पत्रास अपिलार्थीने दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ रोजी सदर बाब मान्य असल्याची व मार्च २०20 पर्यंतच्या देयकांबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी कळविले आहे.

➢ अपिलार्थींनी जून २०20 नंतर मीटर वाचनाप्रमाणे देयके देण्याबाबत मागणी केलेली आहे. परंतू माननीय आयोगाचा आदेशा क्र.३२२/२०१९ दिनांक ३० मार्च २०२० अन्वये सदर ग्राहकांचे बिलींग हे माहे जून २०२० पासून निर्देशांकाप्रमाणे होत आहे, सबब, अपिलार्थींना मीटर वाचनाप्रमाणे देयके देणे सद्य स्थितीत शक्य नाही.

➢ प्रत्येक महिन्याच्या उर्जा मित्र बैठकीमध्ये संबधीत ग्राहकाच्या तक्रारीबाबत सविस्तर चर्चा करून वस्तुस्थिती अवगत करण्यात आली.

➢ वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थींचे अभिवेदन फेटाळण्यात यावे अशी विंनती प्रतिवादींनी केली आहे.

<u>विश्लेषण व निर्णय</u>

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी हे महावितरणचे ३ एचपी मंजूर भार असलेले बोरगाव येथील कृषी ग्राहक आहेत. त्यांचा विद्युत पुरवठा ११ केव्ही वाळवा फिडरवर आहे. माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा आदेश क्र.३२२ /२०१९ दिनांक ३० मार्च २०२० अन्वये जून २०२० पासून एच टी फिडर इनपुट बेस आधारीत ग्रुप मिटरींग (Input of HT base of feeder-based Group Metering / billing for AG consumers) आधारीत ५०२ एच टी फिडरची निवड करण्यात आली. या ५०२ एचटी फिडरमध्ये ११ केव्ही वाळवा वाहिनीचा समावेश करण्यात आलेला आहे. माननीय आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे फिडर इनपुट बेस आधारीत एचपी इंडेक्सप्रमाणे बिलींग करण्याचे आदेश दिले.

६. फिडरवरून वीज घेत असलेल्या कृषी ग्राहकाच्या ग्रुपसाठी एप्रिल २०२० ते मार्च २०२५ या कालावधीसाठी बिलींग करण्याचे ठरविले. परवाना धारकांनी सर्व ग्राहकांना योग्य मीटरद्वारे वीज कायदा २००३ च्या अधिनियम ५५ अन्वये वीज पुरवठा करणे गरजेचे होते. मात्र ४२ लाख कृषी ग्राहकापैकी १५ लाख कृषी ग्राहकांना

म.वि.नि.आ.

मीटरद्वारे वीज पुरवठा केला जातो त्यातील काही मीटर स्लो आहेत, तर, काही चालत नाही. त्यासंबधी माननीय आयोगाच्या टॅरीफ आदेश क्र.३२२/२०१९ दिनांक ३० मार्च २०२० मधील भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

*"8. TARIFF PHILOSOPHY, TARIFF DESIGN AND CATEGORY-WISE TARIFFS FROM FY 2020-21 TO FY 2024-25*

*... .... .... .... ....*

*L] Agriculture Metering and Billing:*

*8.1.32 As per Section 55 of the EA, 2003, Licensees are required to supply power to all consumers through correct meters. However, after even more than a decade, as many as 15 lakh out of 42 lakh (around 35%) agricultural consumers are being supplied through un-metered connections. Further, even in case of metered consumers, dismal state of metering and billing (compared to utility records, meters are present only 27% of metered AG consumers) has been highlighted by AG Working Group in its Report. Under the circumstance, an interim innovative approach using Feeder input based AG group metering and billing scheme will have to be adopted in future. Such approach can be easily implemented for 502 sample feeders that were selected for the study by AG Working Group constituted by the Commission, since the AMR/MRI feeder meter data and mapping of consumers/DTCs, indexing of AG/Non-AG consumers and framework for technical loss assessment on these feeders is already in place. Further, the billing based on Feeder input based Group metering scheme for identified 502 sample feeder shall be subject to ceiling of 3000 hours/HP/annum. Any shortfall/excess in billing in terms of 750 hours/HP/quarter shall be adjusted in subsequent quarters subject to ceiling of 3000 hours/HP/annum on fiscal yearly basis.*

*8.1.33 For extending such Feeder based Group metering/billing scheme for all AG consumers across state would require detailed exercise of ensuring regular availability of AMR/MRI data for all feeders, addressing CT/PT errors, communication errors, mapping/indexing of consumers on feeders/DTCs, assessment of technical loss levels on these feeders, validating/updating records through field study and putting in place protocol for publishing feeder-wise energy accounting data in transparent manner in public domain. MSEDCL is directed to submit roadmap and timebound action plan for undertaking such exercise within two months from issuance of the Order. Meanwhile, existing practice of HP based Tariff in case of un-metered AG consumers and meter based Tariff for metered AG consumers (as per prevalent classification of zones) will have to be continued for some*

*time for all other AG consumers connected on Feeders other than identified 502 feeders, subject to approval of roadmap/action plan to extend Feeder input based group metering scheme to cover all remaining feeders for the purpose of AG metering and billing. Once the feeder input based group metering scheme is operationalised to cover all such feeders as per roadmap to be approved, need for continuation of HP based Tariff for un-metered AG consumers or zone-based classification would not arise. The Commission shall review this arrangement at the time of MTR based on progress of feeder-input based Group metering scheme. The Commission has given certain directions to address this important issue."*

The Commission issued a clarificatory order dated 30.04.2020 in Case No. 79 of 2020 in respect of petition filed by MSEDCL for seeking clarification on certain issues of the Multi Year Tariff Order dated 30 .03.2020 in Case No. 322 of 2019. The relevant points are reproduced as below:

Commission's Clarificatory order dated 30.04.2020 in Case No.79 of 2020:

**Point No.18:**

*"The Commission in its MYT Order dated 30 March 2020, after taking into consideration the Report Submitted by Working Group for Agricultural Consumption Study, has directed MSEDCL to start feeder input-based billing to agricultural consumers connected on 502 feeders which was selected by the Working Group for its study. The Commission has also directed MSEDCL to submit within two month a road map for expanding such feeder input-based billing to all Agricultural Consumers".*

**Point No.21:**

*"Therefore, till the feeder wise actual technical losses are not available, the Commission allows MSEDCL to use 18% as Technical Loss for implementing feeder input based billing to Agriculture consumer connected on 502 selected feeders. Further, this billing method (billed for units consumed arrived based on feeder input) will be applicable to all Agriculture Consumers (metered or un-metered) connected on that feeder".*

७. त्यानंतर प्रतिवादी महावितरण यांनी प्रसिध्द केलेले परिपत्रक क्र.३२६ दिनांक ११ मे २०२० चा संबधीत भाग खालीलप्रमाणे.

*"Having, clarified as above, the Commission directs MSEDCL to complete technical loss computation of 502 selected feeders within 3 months and submit the same for approval of the Commission. Further in order to enhance transparency of feeder input based billing, the Commission directs MSEDCL to comply with the following:*

*a) Publish AMR data of these selected 502 feeders for previous month on its website by 7th of every month.*

*b) Publish on its website daily meter reading of these selected 502 feeder at 0000 hrs on weekly basis on each Monday.*

*c) Compute and publish on its website monthly feeder consumption index for each of this selected 502 feeder by 10th of every month.*

*d)* ***Based on such feeder consumption index as per tariff order, generate monthly bill to Agricultural consumer connected on that feeder. However, bill should be issued to consumer on quarterly basis showing monthly consumption for three months based on feeder consumption index for respective month." (Emphasis added)***

८. महावितरणने कृषी कार्य गटाचा अंतिम अहवाल संकेसस्थळावर ठेवलेला आहे. त्या अहवालावरून असे निदर्शनास येते की, सदर अहवालात ३७ फिडरच्या तांत्रिक हानीचा अभ्यास करण्यात आला. तांत्रिक हानी ही १.५५ % ते ५.०२ % असल्याचे आढळून आले. त्याव्यतिरिक्त डिटोरेटेड लाईन व इतर बाबी विचारात घेता ही विद्युत हानी ८ % पर्यंत जाते. एचटी इनपुट मीटरींगमध्ये १८ % विद्युत हानीची तरतुद केली आहे. १८ % विद्युत हानीची वजावट करून, त्यावर असलेल्या वाडीवस्तीतील घरगुती ग्राहकांनी वापरलेली युनीटस वजा करून राहीलेल्या युनीटसवर प्रती एचपी इंडेक्सप्रमाणे वीज देयके देण्यात येतात. सबब, ग्राहकांना वीज देयके देताना काही अन्याय झाला असे वाटत नाही.

९. प्रतिवादींनी असे निदर्शनास आणून दिले की, भौगोलिकदृष्टया कृषी ग्राहकांना स्टॅटिक मीटर बसविणे जिकरीचे असून त्यांचे मीटर वाचन करणे अवघड आहे. प्रतिवादींचे पुढील कालावधीतील ते उद्दीष्ट आहे, त्यामुळे सद्य स्थितीत "एच टी फिडर इनपुट बेस" हा ग्राहकांसाठी व महावितरणसाठी चांगला पर्याय आहे.

१०. प्रतिवादींनी असे नमुद केले की, वैयक्तिक मीटर वाचनाबाबत खालील प्रमाणे आव्हाने आहेत

१. कृषी मीटर भरपूर ठिकाणी विखुरलेले असल्यामुळे सर्व ठिकाणी ठराविक वेळेत पाहोचणे अवघड आहे.

लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

२. अनेक वेळा मीटर बॉक्सला कुलूप लावलेले आढळून येते, कुलूप उघडण्यासाठी ग्राहक येईपर्यंत वाट बघणे व्यावहारीक दृष्टया कठीण आहे.

३. अनेक कृषी ग्राहकांची मीटर बंद वा जळालेले असल्यामुळे मीटर रिडींगची नोंद घेता येत नाही.

४. मीटर बॉक्स अडचणीच्या ठिकाणी लावलेला असल्यामुळे मीटरपर्यंत पोहोचता येत नाही.

ग्राहकांना स्वतःचे मीटर वाचन करून महावितरणला पाठवून देण्याची सुवीधा उपलब्ध असतानाही काही कृषी ग्राहकांनी मोबाईक क्र. अद्यावयत केला नाही. सबब, ती सुवीधा कृषी ग्राहक वापरत नाही.

अपिलार्थींचे हे प्रगतीशील शेतकरी असून ऊस बागायतदार आहेत. त्यामुळे अपिलार्थीवर एचपी इंडेक्स प्रमाणे होणारे ५० युनीट ते २८० युनीट प्रती महिना हा योग्य आहे.

१२. माननीय आयोगाने यासाठी जो अभ्यास गट निर्माण केला, तो राज्याच्या प्रगतीच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल आहे. कृषी मीटरींग, बिलींग, वीज गळती आणि वीज चोरी रोखणे हे महावितरणपुढे प्रमुख उद्दीष्ट आहे. ह्या फिडरवरील कृषी ग्राहकांने चोरी रोखण्यासाठी महावितरणला मदत करणे आवश्यक आहे. याबाबतची सर्व माहिती प्रतिवादींच्या ऑनलाईन प्रणालीवर उपलब्ध आहे. प्रतिवादींनी त्याबाबत पारदर्शकताही दाखविली आहे.

१३. यासर्व बाबींचा विचार करता मंचाने आपल्या दिनांक २६ डिसेंबर २०२२ च्या आदेशाने तक्रार अर्ज योग्य रित्या नाकारला आहे, त्यामुळे, मंचाच्या आदेशात फेरफार करण्याची गरज वाटत नाही.

१४. सबब, अपिलार्थींचे अभिवेदन नामंजूर करण्यात येत आहे.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)